महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : एमआयएस-०६१५/सीआर-०३/२०२१/तीन दिनांक : २२ जुलै, २०२१

-: **प्रसिद्धीपत्रक** :-

**विषय** :- अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या दाव्याबाबत.
**संदर्भ** :- आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २७ जानेवारी व १० मार्च, २०२१ रोजीचे प्रसिद्धीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२०, महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२० व महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा - २०२० या तीन परीक्षांच्या जाहिरातीस अनुसरून आयोगास अर्ज सादर करताना अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांना त्यांच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ समक्ष प्राधिकाऱ्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या अनाथ प्रमाणपत्राची प्रत स्कॅन करून आयोगास सादर करण्याची सूचना आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकांद्वारे करण्यात आली होती. त्यानुसार, संबंधित उमेदवारांनी सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येऊन उमेदवारांची यादी आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक १० मार्च, २०२१ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकांद्वारे प्रसिद्ध करण्यात आली.

**२.** शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक: अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ मधील "ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील." ही तरतूद आणि काही उमेदवारांनी सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्रामध्ये नमूद केल्यानुसार त्यांच्या नातेवाईकांची माहिती उपलब्ध होणे व मुलांच्या कागदपत्रावर जातीचा उल्लेख असणे या बाबी विसंगत असल्याचे दिसून आले. सदर विसंगतीच्या अनुषंगाने शासनाच्या महिला व बाल विकास विभागाकडून दिनांक १३ जुलै, २०२१ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार, जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याच्या विहित अंतिम दिनांकापूर्वी प्रमाणित ग्राह्य अनाथ प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांची यादी सोबत परिशिष्ट क्रमांक १ मध्ये संबंधितांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**३.** अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या परंतु विहित मुदतीमधील ग्राह्य अनाथ प्रमाणपत्राची प्रत आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक २७ जानेवारी व १० मार्च, २०२१ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकांद्वारे देण्यात आलेल्या सूचनेनुसार सादर न केलेल्या तसेच उपरोक्त परिच्छेद क्रमाक २ मध्ये नमूद दिनांक १३ जुलै, २०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये प्राप्त अभिप्रायाच्या अनुषंगाने संबंधित उमेदवारांचा अर्जाद्वारे केलेला अनाथ आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित परीक्षांची निकालप्रक्रिया राबविण्यात येईल.

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई

**परिशिष्ट - १**

**जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याच्या विहित अंतिम दिनांकापूर्वी प्रमाणित ग्राह्य अनाथ प्रमाणपत्र सादर केलेले उमेदवार**

**(१) राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२० (जाहिरात क्रमांक १९/२०१९)**

| अ. क्र. | नोंदणी क्रमांक | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| १ | ०१५०१९१९२४१२१९०७३५४ | एस्. बी. सुंदरी |
| २ | ०१५०१९२०१३०१२०३१७०९ | चावला अर्जुन बटकु |
| ३ | ०१५०१९२००४०१२००३१२३ | करवंदे अमृता प्रणय |
| ४ | ०१५०१९२०११०१२००३६९३ | बाबर अप्पासाहेब अशोक |
| ५ | ०१५०१९२०१००१२०१००८३ | इंगळे नारायण दत्ता |

**(२) महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२० (जाहिरात क्रमांक ०५/२०२०)**

| अ. क्र. | नोंदणी क्रमांक | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| १ | ०२०००५२००४०३२००७६९७ | एस्. बी. सुंदरी |
| २ | ०२०००५२०१९०३२००२९४९ | चावला अर्जुन बटकु |
| ३ | ०२०००५२०१४०३२०१०७७९ | करवंदे अमृता प्रणय |
| ४ | ०२०००५२०११०३२०१०३६६ | बाबर अप्पासाहेब अशोक |
| ५ | ०२०००५२०१९०३२०५२८१२ | इंगळे नारायण दत्ता |

**(३) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा - २०२० (जाहिरात क्रमांक ०६/२०२०)**

| अ. क्र. | नोंदणी क्रमांक | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| **निरंक** | | |